वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्यालय, पर्यावरण व प्रदूषण विभाग, विरार

जा.क्र.वविशम/पर्या/ १३९ / २६-२७

दिनांक :- २६/१०/२०२६

"जाहीर दरपत्रक"

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पर्यावरण व प्रदूषण विभागामध्ये खाली उल्लेख केल्याप्रमाणे फटाके फोडताना नागरिकांनी आवश्यक सुरक्षा उपाययोजना व पर्यावरणपूरक पद्धतींचे पालन करण्याबाबत पथनाट्याव्दारे माहिती देणे. सदर काम करण्यास इच्छुक संस्था/ठेकेदार यांनी त्यांच्या लेटरपॅडवर खालील उल्लेख केलेल्या कामाचे दर (सर्व करांसहित) दि.२६/१०/२०२६ ते दि.२८/१०/२०२६ रोजी दु. ३.०० वा. पर्यंत वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, पर्यावरण व प्रदुषण विभाग, विरार (प.) यांच्या आवक बारनिशीकडे सादर करण्यात यावेत.

अ.क्र.	कामाचा तपशिल	दर (रूपये) (सर्व करांसहित)	
		अंकात	अक्षरात
१.	दिपावलीत पर्यावरणपूरक फटाके फोडणे व पर्यावरणपूरक पद्धतींचे पालन करण्याबाबत पथनाट्याव्दारे जनजागृती /माहिती देणे.		
२.	**काम पूर्ण करण्याचा कालावधी**		
३.	**इसारा रक्कम**	रु.१०,०००/-	

-: अटी - शर्ती :-

१. सदर जनजागृतीचे काम वसई विरार शहर महानगरपालिकेने दिलेल्या सूचनेनुसार व निर्धारित कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

२. जनजागृतीचा मुख्य उद्देश फटाक्यांमुळे होणारे वायू व ध्वनी प्रदूषण टाळणे व नागरिकांना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यास प्रोत्साहित करणे

३. शाळा, महाविद्यालये, प्रमुख चौक, बाजारपेठा व नागरिकांची वर्दळ असलेल्या ठिकाणी जनजागृती कार्यक्रम राबविणे

४. जनजागृतीसाठी वापरण्यात येणारे बॅनर, फलक, माहितीपत्रके व इतर साहित्याचा मजकूर वसई विरार शहर महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतरच वापरावा.

५. जनजागृती करताना कोणत्याही राजकीय पक्षाचा, व्यक्तीचा किंवा संस्थेचा प्रचार होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. जनजागृती मोहिमेसाठी आवश्यक मनुष्यबळ, वाहतूक, साहित्य, ध्वनीक्षेपक, छपाई इत्यादींची व्यवस्था संबंधित एजन्सीने करावी.

७. जनजागृती मोहिमेदरम्यान शाळा, महाविद्यालये व सार्वजनिक ठिकाणी शिस्त व सुरक्षितता राखण्याची जबाबदारी संबंधित एजन्सीची राहील.

८. काम पूर्ण झाल्यानंतर जनजागृती केलेल्या ठिकाणांचे छायाचित्रे/व्हिडिओ व कामाचा अहवाल महानगरपालिकेला सादर करणे आवश्यक राहील.

९. प्रत्यक्ष कामाचे समाधानकारक प्रमाणपत्र संबंधित अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल.

१०. नगरपालिकेस आवश्यकतेनुसार कामाचे प्रमाण कमी-जास्त करण्याचा अधिकार राहील.

११. अपूर्ण किंवा असमाधानकारक काम आढळल्यास संबंधित एजन्सीचे देयक नियमाप्रमाणे कपात/रोखून ठेवण्याचा अधिकार वसई विरार शहर महानगरपालिकेस राहील.

१२. शासन/स्थानिक प्रशासनाने फटाक्यांबाबत वेळोवेळी लागू केलेले नियम, ध्वनी मर्यादा व इतर पर्यावरणविषयक नियमांचे पालन करणे संबंधित एजन्सीस बंधनकारक राहील.

१३. दरपत्रक सादर केल्याने काम मिळण्याचा कोणताही हक्क संबंधित दरपत्रकदारास प्राप्त होणार नाही.

१४. सर्वात कमी दर (L-१) प्राप्त झाल्यानेच काम देणे बंधनकारक राहणार नाही. वसई विरार शहर

महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

१५. सदर कामासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या कालावधीतच जनजागृती मोहीम पूर्ण करणे आवश्यक राहील.

१६. कोणत्याही कारणास्तव कामास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित एजन्सीची राहील.

१७. वसई विरार शहर महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यास सदर दरपत्रक प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार राहील.

१८. देयकातून लागू असलेले TDS/GST-TDS अथवा इतर वैधानिक कपाती नियमानुसार करण्यात येतील.

१९. वरील सर्व शर्ती व अटी मान्य असल्याचे दरपत्रक सादर करताना संबंधित एजन्सीने स्वाक्षरी व शिक्क्यासह नमूद करणे आवश्यक आहे.

(हर्षला राणे)
उपायुक्त (पर्या)
वसई विरार शहर महानगरपालिका